म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2349

REFBK-0022287
REFBK-0022287

# सलाम

सलाम,
सबको सलाम,
ज्याच्या हातात दंडा
त्याला सलाम,
लाथेच्या भयाने
डावा हात गांडीवर ठेवून
उजव्या हाताने सलाम,
बघणाऱ्याला सलाम,
न बघणाऱ्याला सलाम,
विकत घेणाऱ्याला सलाम,
विकत घेण्याचा इशारा करणाऱ्याला सलाम,
सलाम, भाई, सबको सलाम.

वटारलेल्या प्रत्येक डोळ्याला सलाम,
शेंदूर थापलेल्या दगडाला सलाम,
लाखो खर्चून बांधलेल्या देवळांना सलाम,
देवळांतल्या देवांच्या धाकाला सलाम,
देवांचे आणि धर्मांचे कंत्राट घेणाऱ्यांना सलाम,
रिकाम्या हातातून उदी काढणाऱ्या बुवाला सलाम,
हवेतून आंगठी काढणाऱ्या बडेबुवाला सलाम,
शनीला सलाम,
मंगळाला सलाम,
भीतीच्या प्रत्येक ठेकेदाराला सलाम,
आईवर आयुष्यभर गुरकणाऱ्या बापाला सलाम,
बापावर गुरगुरणाऱ्या साहेबाला सलाम,
साहेबाची टरकवणाऱ्या
त्याच्या साहेबाला सलाम,
सलाम, प्यारे भाइयों और भैनों,
सबको सलाम.

ज्याच्या हातात वृत्तपत्र
त्याला सलाम,
भाषणांचे, सभांचे

फोटोसकट रिपोर्ट छापतो त्याला सलाम,
वृत्तपत्रांच्या मालकांना सलाम,
त्यांची वेसण धरणाऱ्या
राज्यकर्त्यांना सलाम,
ज्याच्या समोर मायक्रोफोन
त्याला सलाम,
त्यातून न थांबता बोलतो
त्याला सलाम,
लाखोंच्या गर्दीला सलाम,
गर्दी झुलवणाऱ्या
जादुगारांना सलाम,
भाइयों और भैनों, सबको सलाम.

नाक्यावरच्या दादाला सलाम,
हातभट्टीवाल्याला सलाम,
स्मगलरला सलाम,
मटकेवाल्याला सलाम,
त्यांनी पेरलेल्या हप्त्यांना सलाम,
लोकशाहीलाबी सलाम,
ठोकशाहीलाबी सलाम,
सत्तेचा ट्रक चालवणाऱ्यांना सलाम,
ट्रकखाली चिरडलेल्या
गांडुळांना, कुत्र्यांना सलाम,
ज्याच्या हातात चाकू त्याला सलाम,
विमानातून बॉंब फेकणाऱ्यांना सलाम,
शस्त्रास्त्रांच्या प्रचंड व्यापाऱ्यांना सलाम,
काळाबाजारवाल्यांना सलाम,
त्यांना फाशी देण्याची घोषणा करणाऱ्यांना सलाम,
गटारातल्या पाण्याने इंजेक्शने भरणाऱ्यांना सलाम,
तिरडीचे सामान विकणाऱ्यांना सलाम,
तिरडी उचलणाऱ्या खांद्यांना सलाम,
मौत सस्ती करणाऱ्या सर्वांना सलाम,
सलाम, प्यारे दोस्तों, सबको सलाम.

बिळांना सलाम,
बिळांतल्या उंदरांना सलाम,

घरातल्या झुरळांना सलाम,
खाटेतल्या ढेकणांना सलाम,
गजकर्णी भिंतींना सलाम,
पिचलेल्या बायकोला सलाम,
दीड खोलीतल्या पोरवड्याला सलाम,
गाडीत चेंगरणाऱ्या गर्दीला सलाम,
किडक्या धान्याला सलाम,
भोके पडलेल्या पिवळ्या गंजिफ्रॉकाला सलाम,
धंद्याच्या मालकाला सलाम,
युनियनच्या लीडरला सलाम,
संपाला सलाम,
उपासमारीला सलाम,
सर्व रंगांच्या सर्व झेंड्यांना सलाम,
चाळीचाळीतून तुंबलेल्या
संडासातल्या लेंड्यांना सलाम,
मानगूट पकडणाऱ्या
प्रत्येक हाताला सलाम,
सलाम, भाइयों और भैनों, सबको सलाम.

या माझ्या परमपवित्र इत्यादि देशाला सलाम,
या देशाच्या सुउदात्त सुमंगल सुपरंपरेला सलाम,
सर्व बिलंदर घोषणांना सलाम,
जातिभेदांच्या उकिरड्यांना सलाम,
या उकिरड्यांतून सत्तेचे पीक काढणाऱ्यांना सलाम,
उपनिषदे आणि वेदांना सलाम,
साखरकारखान्यांच्या दादांना सलाम,
त्यांच्या शेकडो लॉऱ्यांना सलाम,
निवडणुकींना सलाम,
निवडणूकफंडाला सलाम,
अदृश्य बुक्क्यांना सलाम,
मतांच्या आंधळ्या शिक्क्यांना सलाम,
ससा हाती असलेल्या पारध्यांना सलाम,
त्यांच्या तैनातीतल्या गारद्यांना सलाम,
दलितांवर अत्याचार करणाऱ्यांना सलाम,
या बातम्या वाचणाऱ्या सर्व षंढांना सलाम,
सलाम, भाइयों और भैनों, सबको सलाम.

सत्तासंपत्तीच्या भडव्यांचा देश म्हटले
तर डोके फोडतील,
हलकट लाचारांचा देश म्हटले
तर रस्त्यावर झोडतील,
खरीदले जाणाऱ्यांचा देश म्हटले
तर वाटा रोखतील,
देवाधर्माविषयी, नेत्यांविषयी वाईट बोललो
तर नाक्यावर गाठून ठोकतील,
शोषण करणाऱ्यांचा देश म्हटले
तर नोकरीवरून काढतील :
म्हणून आधी माझ्या नपुंसकत्वाला सलाम,
नंतर ठोकू शकणाऱ्या प्रत्येक हाताला सलाम,
आणि त्यानंतर अर्थातच
या माझ्या
परमपवित्र सुउदात्त सुमंगल देशाला सलाम,
या महान देशाच्या महान परंपरेला सलाम.

सलाम,
प्यारे भाइयों और भैनों, सबको सलाम,
अनेक हात असते
तर अनेक हातांनी केला असता सलाम,
लेकिन माफ करना भाइयों,
हात तर दोनच
आणि त्यांतला डावा
लाथेच्या भयाने
ठेवलेला गांडीवर
म्हणून फक्त
उजव्या हाताने सलाम,
सलाम, सबको सलाम
भाईयों और भैनों, सबको सलाम.

मुंबई
२०-४-७५

## मैफल

सतार. एक गच्च मैफल. उंची माणसांची.
अवघडल्या मांड्यांची. सिग्रेटच्या धुराची.
रंगलेल्या पानांची. समज नायलॉनची.
दाद टेरिलिनची. एक गच्च मैफल.

तारांवरून फिरणारी बोटे : स्वरांचे
गुलाबपाणी शिंपडणारी अंधारावर.
प्रत्येक नव्या स्वरासाठी नव्याने
जन्मणारी बोटे. गुलाबाच्या कळीतून
पाकळ्यांसारखी उमलणारी बोटे.
स्वरांनी गहिवरलेली बोटे.
आत्मा असलेली बोटे...
ऐकता ऐकता क्षणभर तो एकटा झाला
रानातल्या चांदण्यासारखा...

पहिल्या रांगेत बसलेले चार प्रोफेशनल ऐके
'क्या बात है'चे सेंटेड रूमाल उडवणारे.
त्यांच्या बाजूला
बंद गळ्याचा एक फर्स्टक्लास गॅझेटेड मानव :
मिसेस गाणे शिकते म्हणून इमानाने आलेला :
सतारीचे सूर त्याच्या कानावर केस होतात...

हे सगळे नको दिसायला, नको जाणवायला.
हवे सुटायला एकदा तरी यांच्यामधून.
पण साले शक्य नसते सुटणे.
देव जाणे, आपणसुद्धा झब्बू असू कदाचित.
सांगवत नाही कसलाच नेम, कुणाचाच.
आपल्याही कानांवर स्वरांचे होत असतील केस :
घाबरून त्याने हात लावून पाहिला कानाला...

काळ्याभोर डोळ्यांचे चार सूर उडाले
आपल्याच नादात. सिंड्रेलाच्या मनासारखी
एक निर्मळ भोळी तान. पुन्हा एक सुरांचे

सैलसे वळण : बकुळीचा वळेसर जसा.
सतारीवरची बोटे तारांत भिनून जातात,
उरत नाहीत. पुन्हा जन्मतात तान्हा सुगंध घेऊन.

उजव्या हाताच्या कोपऱ्यात बसलेली
तंग फ्रॉक घातलेली तरुण पोरगी
सारखी मांड्या बदलीत असलेली :
झर्कन त्याची नजर वळते तिथे.
आपणसुद्धा साले तसलेच.
आपणसुद्धा गॉगल लावल्या बोगऱ्या मनाचे.
दर्जेदार आलापी, लोंचदार ताना, टोकदार मांडणी :
उद्याच्या पेपरातल्या विशेषणांची झुरळे
त्याच्या मनात फिरू लागतात धीटपणे...

चांदण्याने भारलेले स्वरांचे एक तळे
अनंताच्या देवळाजवळ. तो उठून चालू लागतो.
एकटा. माणसांतून उठून. एकटा. मनातल्या
गिचमिडीहून दूर. एकटा. बागेसरीच्या गावाकडे
सुरांच्या हळव्या सोबतीने. एकटा.

मुंबई
८-५-६५

# एक झिंदाबाद कविता

आपले कान बंद करा,
आपले ओठ घट्ट मिटा,
आपले डोळे झाकून घ्या,
सावधान ! गल्लीच्या नाक्यावर
एक मोठा दादा असतो :
बारा भट्ट्या आहेत त्याच्या
मालकीच्या. खून पडेल.
सावधान. खाली मान.
बंद डोळे. बंद कान.

पुढारी आले. नमस्कार.
झिंदाबाद. जयजयकार.
पुढारी साधे असतात :
त्यांच्या नावे बँकेमधे
खातेदेखील असत नाही.
पुढाऱ्यांना बूड असते,
बुडाखाली खुर्ची असते,
खुर्चीखाली सत्ता असते,
सत्तेखाली गुंड असतात,
गुंडांखाली पोलीस असतात,
पोलिसांखाली...खबरदार :
आधी ओठ घट्ट मिटा.
सावधान. खाली मान.
बंद डोळे. बंद कान.
उद्याच्या पेपरामधे
पुढाऱ्यांचा फोटो येईल.

मला खूप भीती वाटते.
तुला खूप भीती वाटते.
त्याला खूप भीती वाटते.
तिला खूप भीती वाटते.
भीती जरा थांबण्यासाठी
केमिस्टकडे गोळ्या असतात :

गोळ्या घेताच झोप येते,
झोप येताच भीती थांबते.
लहान भीती : दोन गोळ्या,
मोठी भीती : सहा गोळ्या,
वीस गोळ्या घेतल्या तर
भीती थांबते कायमची.
खबरदार. ओठ मिटा.
त्याआधी गोळ्या गिळा.
सावधान. खाली मान.
बंद डोळे. बंद कान.

काळोखाच्या रांगेमधे
निमूटपणे उभे रहा.
पण राव, एक सांगा :
ही रांग कुठे जाते ?
खबरदार. प्रश्न नको.
जो प्रश्न विचारील
त्याची पटकन नोकरी जाईल :
माणसाला बायको असते,
बायकोला पोरे होतात,
पोरांना भूक लागते,
भुकेला नोकरी लागते,
नोकरीला मनाचे मढे लागते.
ही रांग कुठे जाते ?
ही रांग कुठे जाते ?
सावधान. खाली मान.
बंद डोळे. बंद कान.
तरीपण ही रांग कुठे जाते ?

मुंबई
२२-५-६५

## उंदीर

रंगीबेरंगी साड्यांच्या सुखवस्तू समूहात
तो एक कवी. तुपाळ यश त्याच्याही
प्रतिष्ठित चेहऱ्यावर. उजव्या बाजूला
चार आकडी पगाराचे लाकडी फळांसारखे
पुरुष. सर्व यशस्वी. त्यांत तो कवी.
तोही यशस्वी. तुपाळ थुलथुलीत यशस्वी.

आधी त्याने उघडली कवितांची वही,
मग तोंड : जे होई अधूनमधून बंद
उच्चारांनुसार : सुशोभित दिवाणखान्यात
नसतात माशा ही एक देवाची कृपाच.

फडफडली टाळ्यांची अनेक कबुतरे
त्याच्या आवाजाभोवती. कुठल्याशा भावुक
नजरेत कमावलेला लाडीकपणा लकाकून
म्हणाला शब्दांवाचून, "राजा, तुझीच झाले असते रे !
पण आता उशीर झाला (घरी जायला.)"
आणि अधिकच तापला कवीचा आवाज.
तो म्हणत होता. म्हणत होता. टाळ्यांच्या
कबुतरांत न्हात होता. तापत होता.
म्हणता म्हणता बुडाला अचानक
रंगीबेरंगी साड्यांच्या सुखवस्तू समूहात...

तो कवी बुडाला : पण दुसऱ्या दिवशीच्या
वृत्तपत्रांत आल्या नाहीत शोकाच्या चार ओळीही.
कुणीही ढाळले नाहीत अश्रू त्याच्या थडग्यावर.
त्याने स्वतःच येऊन घरी ढाळले अश्रू
आपल्या तुपाळ थुलथुलीत यशावर
आणि त्याचा आत्मा उंदीर होऊन शिरला
एकाकीपणाच्या अंधाऱ्या बिळात...

मुंबई
२४-१०-६५

## पावणेआठ

गटारनाल्यात न्हाणारे नागवे पोर :
वय वर्षे सात किंवा असेल त्याहून कमी.
त्याचे डोळे माणसाचे तरी पाखराहून निष्पाप.
गटारपाण्यात डुबकी घेऊन पुन्हा उभे.
घाणीहून घाण आणि गंगेहून स्वच्छ.
घाणीत असून घाणीच्या पार असलेले :
कारण अखेर घाण ही एक जाणीवच.

बाजूच्या अलिशान इमारतींना जाचणारा
गटारनाला : वाऱ्यावर वाहणारा वाईट वास,
काठावरच्या झोपडपट्टीतली अचकटविचकट
माणसे, हिडीस प्रदर्शने, शिव्या, मारामाऱ्या...

गटारनाल्यात न्हाणारे नागवे पोर
डुबक्यांवर डुबक्या घेते मजेत हसत.
मी रस्त्याने जाताना बघतो सांस्कृतिक शहारून
तेव्हा माझ्या मनगटावरल्या शॉकप्रुफ घड्याळात
असतात वाजलेले पावणेआठ.
समस्त मानवांच्या घड्याळांत पावणेआठ.

मुंबई
४-११-६७

## संस्कृती

यांना आव्हाने लागतात हातभट्टीच्या
बोहेमियन धुंदीची, कोत्या शब्दांच्या
खोट्या गुंतागुंतींची, अर्थशून्य करसतींची
तत्त्वज्ञानाची काव (काव) फासलेल्या.
यांचा नावीन्याचा शोध संपतो दैनिकाच्या
फोटोसकट रिपोर्टात नाव छापून येताच
आणि जेव्हा हार घालतात यांच्या गळ्यात
नेहमीचेच विझलेले सराईत यशस्वी
तेव्हा खरी फुलेदेखील क्षणभर
शरमेने कागदाची सुशोभित होतात.

दैनिकाच्या दीड कॉलमापलीकडे ज्याची
धाव नसते असा सरडा सरावाने
गरुडांच्या उड्डाणावर थुंकू लागतो
दीड लाख खपाच्या हुकमी आवेशात,
प्रसिद्धीचा शेंदूर थापून करतो दगडांचे देव.
हा यशस्वी. तो यशस्वी. जाहिरात्या यशस्वी.
माजोरी यशस्वी. चतुर यशस्वी. लाचार यशस्वी.
धमक्या यशस्वी. खमक्या यशस्वी.
आणि मग सत्ताधिष्ठित राजकीय पुढारी
या यशस्वी माना चिमटीत धरून
बसवतात त्यांना सांस्कृतिक कमिट्यांच्या खुर्च्यांवर
भत्त्यांच्या मऊ सुशोभित गाद्या असलेल्या.
आणि करतात त्यांच्या समारंभांची उद्‌घाटने :
(पुढल्या निवडणुकीत विजय आमचाच आहे.)

देवा, माझ्या आत्म्याला क्षमा कर :
माझ्यात हिंमत नाही नागडे हिंडण्याची.

मुंबई
६-१२-६५

## राघोबा रघुनाथ

बळकट बैल नमवणारे जू तसे होते
राघोबा रघुनाथांचे खंदे खांदे. भाळी
दुबोटी गंध. करारी ओठांवर त्यांच्या
पावसाळी ढगासारख्या भरघोस मिशा.
हशा असा बुलंद की छपराचे गोणपाट व्हावे.
स्नानसंध्या, जपजाप्य नियमित सर्व.
पहाटेचे शंभर नमस्कार चुकले नाहीत
आणि मग धारोष्ण दुधाची तुडुंब चरवी.
सोवळे नेसल्यावाचून भोजन नसे कधीच.
बाहेर दोन बाया ठेवल्या होत्या. गोष्ट खरी.
पण घरातल्या सौभाग्याचीही कदर होती.
चार मुलगे झाले (घरात). त्यांना ठेवली
गडगंज संपत्ती राघोबा रघुनाथांनी
आणि बाहेरच्या बायांचेही भले केले
त्यांच्या संततीसकट. शंभर खांद्या
असलेल्या वडासारखे राघोबा रघुनाथ
एक दिवस (मेले नाहीत) निवर्तले.

राघोबा रघुनाथांचे पणतू भोगतात मजेत
परंपरागत संपत्ती. कॉलेजात शिकतात.
फिटपॅंट शोभते त्यांच्या लुकड्या तंगड्यांना.
लाखांच्या लाळेत भिजलेल्या फिल्मी गीतांनी
धुंदावतात. गुळगुळीत टेरिलिनने झाकतात
खांद्यांची फळकुटे. पहाटे बेड-टी घेतात.
तसे सज्जन आहेत. बाहेरचा नाद नाही.
शिकून पुढे नोकऱ्या पटकावतील.
लग्ने करतील. मुले होतील. मग स्कार्फ
गुंडाळलेले रिटायर्ड लाइफ. आणि
एक दिवस कशाने तरी गचकतील :
पण ते निवर्तणार नाहीत राघोबा रघुनाथांसारखे.

मुंबई
२५-१२-६५

## तुम्ही

तुम्ही आवडता मला : म्हणूनच काहीसा
दूर रहातो तुमच्यापासून. दुरूनच रंग
दिसतात तुमचे, लय जाणवते, समज
येते तुमची अधिक. सिनेमाच्या झुंबडरांगा
बघून चिडत नाही आता. एका कुबट
खोलीत, फूटपाथवर, हपिसे नामक कुचकट
बिळांत करणार काय ? त्याहून सिनेमाच
बरा : स्तनाळ नटी मज्ञा आणते पडद्यावर :
त्यानंतर घरी बायकोही बरी वाटते.

तुम्ही रडता. सुखी होता. लग्ने करता.
आईबापे होता. सभांना जाता. मसणात जाता.
ठेचून भरल्या गाडीत रमी खेळता. फूटबोर्डावर
लोंबकळून चर्चा करता राजकारणावर.
तुम्ही प्रेम करता. कधी कधी चक्क
मोहब्बत याने प्यार देखील करता.
मोर्चे काढता. घोषणा देता, पण बसत
नाही तुमचा बसा अनंतकाळपर्यंत.
चणे खाता. गोळ्या झेलता. हुतात्मे
होता : मग तुमच्या स्मारकांवर कावळे
शिटतात आणि यशस्वी पुढारी हार
चढवतात निवडणुकीपूर्वी. तुम्ही खिसे
कापता. व्याख्याने ऐकता. राज्ये आणि
हातभट्ट्या चालवता. देवळात जाता.
चाकू दाखवता. त्याग करता. लफडी
करता. तुम्हाला आत्मा असतो : तर्काच्या
ढुंगणावर लाथ हाणणारा आत्मा असतो.

तुम्ही वहात असता. सारखे वहात असता.
गती. उलटसुलटवरखालीआडवीतिडवी गती.
केलेच पाहिजे. गेलेच पाहिजे. झालेच पाहिजे.
सोचनेकोभी टायूम नही. सारखे जगत असता.
सारखे मरत असता. तुमचे वंश फळत असतात.

तुमचे वंश गळत असतात. तुम्हाला परंपरा असते.
दादा असतात गल्लीपासून दिल्लीपर्यंत.
तुम्ही मते देता. रस्त्यावर मुतता. तुम्हाला
बुवा लागतात आणि बेवडाही लागतो.
तुम्ही जिवंतपणी प्रेतयात्रा काढता एखाद्याची
आणि तुम्हीच साजरी करता त्याची जयंती.
वखवखल्या नखांनी तुम्ही ओरबाडता
तुमच्यासाठी पाहिलेली महात्म्यांची स्वप्ने.

आणि जेव्हा होत असते बायको बाळंत
तेव्हा घालीत अस्वस्थ येरझारा
तुम्ही वाट पहात असता अपार उत्सुकतेने
एका नव्या चिमुकल्या जगाच्या जन्माची.
आणि तांबडमाती भरलेले पत्र्याचे
गंजके डबरे जेव्हा तुम्ही टांगता कुंड्या करून
तेव्हा त्यात फुले उगवतात. तुम्ही असता
चेहऱ्यांचा घोंगावणारा अपार समुद्र.
तुम्ही असता स्पंदन पावणारे एक विराट काळीज.

अशा सगळेपणात तुमच्या प्रचंड तुम्ही.
मला मिळते माझे माणूसपण शाबूत
तुमच्या अस्तित्वाची लय भोगताना माझ्या रक्तात.
तुमचेपणाच्या गर्भात वाढू लागते माझे
माझेपण आणि माझी आत्मनिष्ठ गाणी.

होय, तुम्ही आवडता मला.

मुंबई
२७-३-६६

# पोपट

प्रवासात आगगाडीतून येताना
शेताच्या लाल लाल बांधावर
दिसला एक हिरवाहिरवागार पोपट.

मग पोपट हिरवेगार उडाला.
पोपट माझ्या मनात शिरला.
पोपट माझ्या मनात फिरला
मन हिरवेगार करीत,
विचार हिरवेगार करीत,
स्वप्ने हिरवीगार करीत.
पोपट बसला खांद्यावर
आणि क्षणभर मी झालो एक हिरवेगार झाड..

मी म्हटले, "मिस्टर पोपट, कसे काय ?"
तो म्हणाला, "मिस्टर कवी, कसे काय ?"
भलताच मिस्किल होता पोपट.
हिरवाहिरवागार पोपट.

प्रवासभर पोपट होता बोलत खूप.
प्रवासभर मीही होतो बोलत खूप.
पोपट म्हणाला, "मिस्टर कवी, करता काय ?"
मी म्हटले, "नोकरी करतो."
पोपट म्हणाला, "नोकरीमधे करता काय ?"
मी म्हणालो, "नोकरीमधे खोटे हसतो.
खोटे बोलतो. बंद गळ्याच्या मठ्ठांना
शहाणे म्हणतो. लाचारांना शूर म्हणतो.
हलकटांना सज्जन म्हणतो.
समर्थांच्या श्वानांना सलाम करतो.
झकास करतो मूल्यांची पोपटपंची.
पहिलीला पगार घेतो :
रहाणीची मान जरा उंच करतो."

पोपटाने माझ्या डोळ्यांत पाहिले :

मला भलतीच भीती वाटली.
वाटले, हा भूल घालून नेईल मला
हिरव्या हिरव्या पंखांवरून
लाल लाल बांधावर.
माझे एक प्रमोशन ड्यू होते :
पोपटाची मला खूप भीती वाटली.
पोपटाने पुन्हा एकदा माझ्या डोळ्यांत पाहिले :
डोळे भरून माझ्या डोळ्यांत पाहिले
आणि तो उडून गेला.
हिरव्या हिरव्या पंखांवर
निळे-निळे आभाळ झेलीत
लाल लाल बांधाकडे
पोपट एकटा उडून गेला.

मुंबई
९-१०-६६

## पुरुषसिंह

जेव्हा मुलायम इस्त्री केलेली पांढरी टोपी
किंचित तिरपी ठेवून हिकमती डोक्यावर
अदृश्य आरशात स्वयंतुष्ट न्याहाळत
चार पावले टाकतो हा पुरुषसिंह
तेव्हा रस्ते टरकतात. फांदीवरचा
कावळाही वचकून शिटायचा थांबतो.
हातभट्टीवाल्यांचे गणवेषधारी आश्रित
याला सलाम ठोकतात पॉलीश केलेला.
मग आणखी चार पावले टाकतो हा पुरुषसिंह
हायड्रोसिल झाल्यागत भासणाऱ्या प्रमत्त डौलाने

विकत घेण्याचे सामर्थ्य जाणतो पुरुषसिंह :
तीही त्याच्या पोलादी पंजाची तरबेज ताकद.
अनुभवी गिऱ्हाइकाने टिचकी मारून
ओळखावे नारळातले पाणी
तशी ओळखतो हा एका नजरेने
हरेक विचारवंताची अचूक किंमत :
दोन सुजाण विचारवंत यानेच चिकटवले
संपादक म्हणून दोन हजार रुपयांवर
आणि अलबत्याला देऊन टाकले
वैचारिक सेमिनार भरवण्याचे घाऊक कंत्राट.
जडजंबालाचार्य जुन्नरकरशास्त्र्यांना
यानेच लावून दिली वार्षिक आठ धोतरे
आणि झाकली ज्ञानाची अब्रू.
मग पुरुषसिंहाने शास्त्रज्ञांना संदेश दिला
आणि साहित्यिकांना उपदेश केला
तेव्हा दैनिकांच्या पहिल्या पानांवर
हायड्रंट फुटल्यागत वाहू लागले
खळखळाट करीत याच्या भाषणांचे कॉलम.

बापहो, पुरुषसिंहाचा जयजयकार करा
कां की ज्याच्या हाती सत्ता
त्याचाच जयजयकार करावा.

बापहो, पुरुषसिंहाच्या भाषणास
गर्दी करोन टाळ्या द्या
कां की तोच तुमच्या मुठी
अर्थपूर्ण बंद करू जाणे.

बापहो, पुरुषसिंहाचाच आदर्श ठेवा
कां की बिचाऱ्या श्वानवंतांवर
तंगडीही उंचावण्यास तयार नसणारी कुत्री
पुरुषसिंहापुढे धापा टाकीत लाळ गाळतात.

बापहो, पुरुषसिंहाचा विजय असो
आणि त्याचेच राज्य असो.

मुंबई
७-११-६६

# उत्तर

जेव्हा राजरस्त्यांवर कोल्ह्यांचा महापूर येतो
आणि एकामागून एक कोसळतात मूल्यांची मंदिरे;
पिवळ्या पत्रांचे जबरदस्त गबर संपादक
नाक्यानाक्यावर उभे राहून विकू लागतात
मसाला भरलेली लज्जतदार कुलंगडी
आणि प्रत्येक इरसाल शिवीचे मोजून दाम घेतात;
जेव्हा गर्दी जमवणारे गल्लाभरू गारुडी पुढारी होतात;
माणसामाणसांत भिंती उभारणारे राजकीय कारागीर
प्रादेशिक निष्ठांचे वणवे पेटवतात
आपल्या विड्या सोयिस्कर शिलगवण्यासाठी;
जेव्हा प्रतिष्ठित गुंड हिंडतात मोटारीतून
आणि मास्तर चालत असतात कसेबसे अंग चोरून;
जेव्हा शासनाच्या कचेरीकचेरीतून माणसांपेक्षा
रक्त शोषणारे ढेकूणच अधिक असतात खुर्च्यांच्या आश्रयाने;
जेव्हा जातीयवादावरच सत्तेची इमारत उठवणारा
छपरावरून देतो राष्ट्रीय एकात्मतेवर व्याख्यान...

तू विचारतोस, कशासाठी माझे शब्द असे
वैराने पिळवटतात, कशासाठी असे दावेदार बनतात?

मुंबई
९-१२-६६

## सूर्ययात्रा

लख्ख किरणांचा शुभ्र शुभ्र पाऊस
एकदा या काळोखावर पडू दे.

शिळी चतकोर चतकोर आयुष्ये :
उपाशी कुत्र्यांची दावेदारी.
या पिचलेल्या डोलकाठ्यांना
एकदा सूर्ययात्रा घडू दे.

आकांक्षांची विटलेली चिरगुटे
किती लोंबत ठेवावीत दांडीवर?
दिशा कोसळून टाकणारे वादळ
एकदा यांच्यावर कडकडू दे.

डोळ्यांत नवा सूर्य दिसेल.
छातीत नवा दिवस असेल.
वळचणीत उबलेला पक्षी
एकदा तीर्थंकर आकाशात उडू दे.

मुंबई
२५-१२-६६

## निर्विवाद

वादांच्या तत्त्वज्ञानांत अडकता कामा नयेत शब्द
हे निर्विवाद सत्य निश्चित कळले होते.
केस पिंजारलेले पोथीनिष्ठ मांत्रिक जागोजाग भेटले,
पक्षागणिक, राष्ट्रागणिक टोप्यांचे नाना रंग पाहिले,
त्यांच्या रंगीत टोप्यांतला शिधाही पळवला शिताफीने
पण त्यांच्या घोषणांच्या कोठड्यांत सापडलो नाही.

ज्याने त्याने गावे आपल्या हृदयातले गाणे
इतरांसाठीही—पण आपल्याच लयीत, आपल्याच तालावर.
वादांच्या तत्त्वज्ञानांत अडकता कामा नयेत शब्द
हे निर्विवाद सत्य निश्चित कळले होते.

मुंबई
१०-६-६७

# देव

मी पाहिले काचेचे संत
भुश्शाचे आत्मे भरलेले,
झोपेच्या शब्दगोळ्यांचे घाऊक कंत्राटदार
रेशमी नेसून प्रवचने करताना :
सामुदायिक विस्मृती पेरीत जाणारी आध्यात्मिक वाणी,
अमुकानंद, तमुकाचार्य, अमुकेशास्त्री.

मी पाहिल्या त्यांच्या आध्यात्मिक सभेत
सुखाचा डायरिया झालेल्या तुंदिल स्त्रिया,
मूल न होणाऱ्या केविलवाण्या बाया,
महाबळेश्वरच्या अलिशान हॉटेलात
कंपनीच्या एक्सपेन्स अकाउंटवर
स्टेनोबरोबर भाडोत्री झोपणारा
कर्तबगार एक्झिक्यूटिव्ह,
बोटांची नखे सारखी खाणारा कारकून
पाच पिढ्यांच्या हीनगंडाचे पोक आलेला,
रित्या भयभीतांचे भक्तिधुंद तांडे...
प्रत्येकाच्या हातात भक्त सटोडिया शेठजीने
छापून फुकट वाटलेली
अमुकानंदांची आध्यात्मिक प्रवचने.

लहान असताना मी
विचारीत असे आजीला :
"आज्ये, देव म्हणजे काय ?"
धगधगणाऱ्या चुलीपुढे भाकऱ्या बडवताना
म्हणायची माझी अशिक्षित आजी :
"मंगेशा, तू पोटभर जेवलस
म्हणजे माका देव पावता."

मुंबई
२१-८-६७

# साहेब

सकाळ झाली
रेडिओचा भोंगा वाजला
मग वाजली भक्तिगीते
खोट्या तुपात शिजवलेली
साहेब उठले झोपेतून
साहेबांनी डोळे चोळले
चूळ भरून पेपर चाळला
मग दात ब्रश केले
मग त्यांनी चहा घेतला
मग साहेब अग्रलेख वाचण्यासाठी
अर्धा तास संडासात जाऊन बसले
साहेबांनी दाढी केली
साहेबांनी आंघोळ केली
(अंडरवेअर वगैरे वगैरे)
साहेबांनी शर्ट घातला
साहेबांनी पँट घातली
साहेबांनी टाय बांधला
मग त्यांनी मोटार काढली
मग ते ऑफिसात गेले
चार नोटा पुटप केल्या
एक स्कीम डिस्कस केली
पंधरा पत्रे डिक्टेट केली
मग ते कंपनीच्या मालकाशी
सहा वेळा ओशट हसले सवयीने
(सवयीने न बघता अचूक टाय बांधीत तसे)
मग त्यांनी ऑफिस सोडले
मग ते घरी आले
मग त्यांनी संसारात इंटरेस्ट घेतला
मग त्यांनी पेपरातली पोलिटिकल न्यूज वाचली
मग त्यांनी डिनर केले
त्यांनी मग. मग त्यांनी
त्यांनी मग. मग त्यांनी
मग त्यांनी रेडिओ लावला

क्लासिकल म्यूझिक ऐकले
मग त्यांना पेंग आली
मग ते, त्यांची बायको
त्यांच्या बेडरूममधे गेली :
सक्सेसफुल साहेबांनी
सक्सेसफुल लग्नानंतर
सक्सेसफुल करतात ते
सर्व सक्सेसफुल केले
मग त्यांना
सक्सेसफुल झोप आली
मग ते
सक्सेसफुल घोरू लागले

मुंबई
१०-९-६७

## गांधीजयंती

तुमचे नाव उच्चारताना व्यक्तित्व थरारते
आणि दिसते काळोखाच्या बंदिशाळेतून
एक राष्ट्र बाहेर येताना मोकळ्या प्रकाशात.
तुमच्या जन्मात एका मुक्तीचा जन्म होता
आणि होता एक आत्मा युगाला आकार देणारा.

किरट्या माणसांना आभाळाचे वावडे असते
म्हणूनच आम्ही महात्म्यांच्या अकलंक शुभ्र चारित्र्याच्या
बनवतो सोयिस्कर टोप्या. म्हणूनच आम्ही
घोषणांचे कंत्राटदार अर्थांचे लिलाव मांडतो
शब्दांच्या बाजारपेठेत. आम्ही वाट पहातो
महात्म्यांच्या निर्याणाची : त्यांच्या फोटोंची
दुकाने थाटण्यासाठी. आमच्या आयुष्याच्या कपाटात
अनेक महात्म्यांच्या पोथ्या करतो आम्ही
वासनांच्या कसरीची सोय लागावी म्हणून.

कदाचित् तुम्ही पहात असाल अतर्क्य अज्ञातातून
कायरांचे कळप, दांभिकांच्या वल्गना, लाचारांची सत्तास्पर्धा,
माथेफिरू रस्त्यांवरचे वखवखलेले वणवे,
झिंगलेल्या दंगली, तुमच्या नामघोषांचे सराईत दलाल...

मी आज चाचपडताना इथल्या कुबट अंधारात
दचकलो हातावर भास होऊन तुमच्या तप्त अश्रूंचा.

मुंबई
२-१०-६७

महालय ठाणे
२२२८७
क्र. ०१५४
२३४१
शाखा (स्थळ प्रत)

# या तुमच्या दैवतांचे

या तुमच्या दैवतांचे मीही धरले होते पाय,
मीही होत्या ओवाळल्या आरत्या आशाळभूत भक्तीने,
चौतीस वर्षे पडले नव्हते माझेही दुधाचे दात,
नव्हती एकही अक्कलदाढ माझ्याही भावड्या जबड्यात.

आकांक्षेच्या पटावर एका दमदार दैवताच्या
जेव्हा फिरवला गेलो मी परतंत्र प्याद्यासारखा
जाणवून असहाय्यता तेव्हा किंचाळलो किंचितसे :
दैवताची जबरदस्त लाथ माझ्या ढुंगणावर—

मी रस्त्यावर : विदूषकी आत्मविश्वासाने प्रथमच थुंकलो
कुरतडत स्वतःचीच नखे, वणवणलो अनवाणी पायांनी,
आपल्याच मनाला भोके पाडीत जागवल्या रात्री,
विटक्या वस्त्रासारखा लोंबकळलो दुर्लक्षित दांडीवर.

नव्या नजरेने माणसे पाहिली माणसांना वापरणारी,
वापरून फेकणारी, पुन्हा नव्या शिड्या शोधणारी :
राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांतले प्रचंड फोरासरोड,
तिथल्या तल्लख जाळ्यांवर नांदणारे बुद्धिमान कोळी.

शिड्यांना स्वातंत्र्य होते आपल्यावरचे पाय निवडण्याचे,
माश्यांना मोकळीक होती आपले मरणजाळे आपणच शोधण्याची :
लटपटले माझे पाय, कोरड्या तोंडात थुंकीही जमेना,
मीही अनेकदा केली माझ्या विदूषकी आत्मविश्वासाची कीव.

कारस्थानी आकांक्षांनी फुगवलेल्या सत्तेच्या फुग्यांवर
जेव्हा रोखली मी माझी इवलीशी गंजलेली टाचणी
तेव्हा माणसाच्या प्रेमाचाच आधार होता एकाकी मनगटाला,
शब्दांच्या फेपऱ्यामागे होती एक विकल करणारी करुणा.

या तुमच्या दैवतांचे मीही धरले होते पाय,
मीही होत्या ओवाळल्या आरत्या आशाळभूत भक्तीने.

मुंबई
२१-२-६८

# तिला उमजलेले कुमारगंधर्व

**(एक सांस्कृतिक बडबडगीत)**

अहो, उद्या कुमारांचं गाणं आहे :
क्लासिकल फोक गाणार म्हणे,
आणि सोबत पीएलांची कॉमेंट्री
त्याच तिकिटात फुकट म्हणे.

असंऽ कसंऽ म्हणता गडे
आपण नाही तर व्हायचं कसं?
आपल्या हलत्या माना तिथे नसत्या तर
कुमारांनी रंगून गाणं गायचं कसं?

कोल्टासच्या मॅनेजरची बायको येणार
तिची अक्कल वनस्पती तुपाची,
बंदीशसुद्धा कळत नाही मेलीला
झिंजोटीची आहे किंवा भूपाची.

पालघरेंची सगळी फॅमिली नक्की येणार :
सुशीसाठी ट्राय करायचं तिथेच स्थळ,
त्यांच्यासारखेच आपणसुद्धा रसिक आहोत,
खर्च-वेळ सोसलीच पायजे एवढी कळ.

अत्तरांचा धुंद धुंद गंध तिथे,
नव्या नव्या साड्या तिथे लफ्फेबाज,
थंडगार अलीशान थेटरामधे
ढेकूण नसतात, कुठेच नाही येत खाज.

ऑफिसमधून संध्याकाळी येताना
पहिल्या रांगेत पाच तिकिटं आणायची,
आणि माझी निळी साडी फॉरिनची
आल्यावर मॅचिंग शोधून ठेवायची.

अहो, उद्या कुमारांचं गाणं आहे :
क्लासिकल फोक गाणार म्हणे,
आणि सोबत पीएलांची कॉमेंट्री
त्याच तिकिटात फुकट म्हणे.

मुंबई
२१-१२-६८

# गिधाडे

हरेक नाक्यानाक्यावर आकर्षक मोक्याच्या
तुम्ही थाटून बसता यशस्वी दुकाने,
तडजोडीच्या तारेवर आयुष्य सावरताना
डगमगत नाहीत तुमचे निर्ढावलेले पाय,
तुमच्या गजबजत्या गर्दीत डोळ्यांआड तुमची भुते
तुमच्या व्यक्तित्वाची शकले उचलून फिरत असतात
शापलेल्या काटेरी एकाकीपणात,
पत्ताही नसतो तुम्हाला कधी हरवले तुमचे चेहरे :
तुम्ही जगत असता मानेवर यशाचे मुखवटे डकवून.

एकही क्षण नसतो तुम्ही पिकवलेला :
प्रत्येक क्षणाचे लुटारू दलाल तुम्ही,
तुमच्यासाठी भाडोत्री गाणी वाजतात,
तुमच्यासाठी भाडोत्री ओठ लाजतात,
यशस्वी वेश्यागृहांचे गबर ठेकेदार
तसे जगत असता तुम्ही फायद्याच्या गब्रू गादीवर
हलक्या उग्र अत्तराचे सांस्कृतिक बोळे कानांत ठेवून.

मला दिसतात तुमच्यावर डोळे रोखून बसलेले
डोंगरापल्याड टपलेल्या गिधाडांचे उपाशी थवे.

मुंबई
२३-३-६९

## उत्सव संपल्यावर

सत्य शोधणाऱ्याच्या भाळी असतो लिहिलेला
आपली विच्छिन्न स्वप्ने घेऊन चालण्याचा ललाटलेख;
भर दुपारी असह्य तापलेल्या निर्जन रस्त्यावरून
त्याचे प्रेम हिंडत असते अनवाणी पायांनी.

किती एकटी होता तुम्ही नौखालीच्या करुणायात्रेत !
तुमच्या खांद्यावरचा क्रूस तुम्हालाच ठाऊक होता :
आत्म्याने चालणाराच निघतो अशा यात्रेला,
आत्म्याखेरीज हिंमत नव्हती कुणाचीही त्या वाटेवर.

सत्य शोधणाऱ्याच्या छातीत अखेर शिरते गोळी :
ध्येयाच्या एकाकी वाटेवर कोसळते त्याचे कलेवर;
मग त्याचे उत्सव मांडले जातात सर्वत्र सुसंघटित,
घोषणा घणाणतात, दिवे झगमगतात उत्सवी मंडपांत.

आता विझून जातील हे उत्सवाचे झगझगीत दिवे,
सभामंडपांचे बांबू काढून नेतील कंत्राटदार :
हिशोब चुकता करून घेऊन निघतील पुन्हा
नव्या मंडपासाठी नवे गिऱ्हाईक शोधीत.

गर्दीचे मनसबदार विसरून जातील तुमची वाट
आणि निघतील नव्या जहागिरीच्या शोधार्थ;
भिंतींवर चिकटवलेल्या चित्रांवरून तुमच्या
कोसळेल नेमेचि येणारा बिलंदर पाऊस.

होलसेल ध्येयवादाच्या वर्तमानपत्री रकान्यारकान्यांत
रस्त्यारस्त्यावर भेळ बांधली जाईल;
बुद्धिवादी नव्या झोळ्या घेऊन निघतील
राजरस्त्याच्या चौकाकडे वैचारिक धोतरे सांभाळीत.

तेजीत येऊ लागतील जातीय सुरुंगांचे व्यापारी,
सत्तेचा वास घेत टोळ्या बदलीत रहातील दरोडेखोर,
नव्या घोषणांसाठी दिली जातील नवी कंत्राटे,
भरबाजारात शिरजोरांच्या थुंकीलाही भाव येईल.

मुंबई
११-१०-६९

# कुंपण

पक्ष्यांची घरे असतात झाडांवर
किंवा सोयिस्कर वळचणीत;
वाघसिंहांची गुहेत रानातल्या
किंवा पिंजऱ्यातही पशुसंग्रहालयातल्या;
गोष्टीतल्या चिमणीचे घर असते मेणाचे
आणि कावळ्याचे शेणाचे;
माणसे रहातात बांधून घरे माती-विटांची;
पण शहाण्याचे प्राक्तनच असते वेगळे :
त्याला बसून रहावे लागते कुंपणावर.

लोखंडाचे चणे खाण्याहून कठीण असते
कुंपणावर बसणे :
कुंपणे करतात काटेरी तारांची,
कुंपणे भलत्या जागी बोचत रहातात,
कुंपणावर बसून
आपली पार्श्वभूमीही नाही चाचपता येत
कारण त्या वेळी दोन्ही हात
गुंतलेले असतात तोल सावरण्यात.

ज्याने शेताला घातले पहिले कुंपण
त्याचे नावही उरले नाही इतिहासात,
उरले फक्त कुंपण.
अश्मयुगात कुंपण नसावे;
पहिले जाहीर कुंपण असावे लोहयुगांतले.
ज्याने घातले पहिले कुंपण
तो त्यावर बसला की नाही—ठाऊक नाही
पण त्याला नमन असो.
घातले नसते जर त्याने पहिले कुंपण
तर झाली असती शहाण्यांची भलतीच गैरसोय.

कुंपण केवढे मोठे असावे—सांगणे कठीण.
व्याप्ती कुंपणाची असते अवलंबून भूमीवर
आणि पार्श्वभूमीवरही बसणाऱ्या शहाण्याच्या.

शहाण्यांची पार्श्वभूमी विकसनशील असते
म्हणूनच अस्सल शहाण्यांना
कुंपणेही बदलावी लागतात :
लहान शेतांची लहान कुंपणे
वाढत्या पार्श्वभूमीला पुरत नाहीत.

शहाणाच केवळ शहाणा असून भागत नाही;
त्याच्या बुडाखालचे
कुंपणही असावे लागते शहाणे.
माणसांसारखीच कुंपणेही
शहाणी आणि खुळी असतात.
ज्या कुंपणाला शेत खाता येत नाही
ते कुंपण शहाणे कुणी म्हणावे ?
रंग बदलणाऱ्या साऱ्याच चतुर सरड्यांची
धाव असते कुंपणापर्यंत
पण ते कुंपणावर चढून बसू शकत नाहीत.
जो कुंपणापर्यंत धावतो तो सरडा.
जो कुंपणावर बसतो तो शहाणा.
ही व्याख्या यशःस्कंदपुराणातून घेतली आहे.

जिथे जिथे शेत आहे
तिथे तिथे कुंपण आहे;
जिथे जिथे कुंपण आहे
तिथे तिथे शहाणा आहे
कुंपणावर चढून बसलेला
अवघड जागी टोचणी सोशीत.
ज्याचे कुंपण रिकामे असते
तो अतिशहाणा
किंवा त्याचा बैल.

आत्म्यालाही देहाचे कुंपण असते.
कुंपणवाद हा वेदान्तोद्भव आहे.
ते आहे एक अस्सल तत्त्वज्ञान
भौगोलिक सीमा न जाणणारे.
सत्तेचे खाणार त्यालाच कुंपण देणार.
देशोदेशीची कुंपणे असतात,

नाना रंगांची कुंपणे असतात,
बुडाबुडाच्या मापागणिक कुंपणे असतात,
काही कुंपणे दृश्य असतात,
काही अदृश्य असतात,
अदृश्य कुंपणावरे बसणारे
दृश्य बुडाचे जादुगार क्वचित् दिसतात,
अशी, तशी, कशीही—पण कुंपणे असतात
हे एक आदिसत्य.

शहाणे कुंपणावर बसतात
पण आपली माणसे पेरून ठेवतात शेतात
आणि काही शेताबाहेर,
माणसे हेरूनही ठेवतात कुंपणावर बसून.
शहाणे, कुंपण आणि परमेश्वर
यांचा थांग लागत नाही.

कुंपणाय स्वस्ति।
कुंपणस्वाराय स्वस्ति।
कुंपणाय नमः।
कुंपणावरील शहाण्याच्या बुडाय नमः।

मुंबई
१२-१०-६९

# हिप्नॉटिस्ट

आम्ही ताटकळलो खेचाखेचीत
प्रचंड गर्दी करून सभामैदानावर,
उन्हाचे पत्रे डसत होते डोळ्यांना,
कण्यावरून वसरत होते घामाचे थेंब,
आम्ही वाट पहात होतो हिप्नॉटिस्ट येण्याची.

धुळीच्या वादळासारखा गल्बला उधळला,
हिप्नॉटिस्ट आले,
बुलंद जयजयकार केला आम्ही,
हिप्नॉटिस्टहो,
आता जंतरमंतर होऊ द्या,
वेळ नको
खेळ सुरू होऊ द्या.

हिप्नॉटिस्ट तयार होऊन उभे राहिले,
वृत्तपत्रांच्या नळकांड्या धरून हातात
जादूच्या कांडीसारख्या
ओवाळल्या त्यांनी गर्दीभोवती :
मोठ्या मथळ्यांच्या शिड्यांवरून
सारा प्रचार डोक्यांत उतरला आमच्या
न वाचता.
मग त्यांनी संकल्पशक्तीने
आमच्या नाकांवर चष्मे ठेवले :
ते म्हणतील त्या रंगांचे आम्ही झालो.
हिप्नॉटिस्टांनी फुंकर घातली :
निष्ठेची अपार लाट पसरली आमच्यावर
अफूच्या गुंगीसारखी.

हिप्नॉटिस्टांनी इशारा केला
हात वर उंचावून :
आमच्यातून घोषणांची कारंजी उसळली.
हिप्नॉटिस्ट म्हणाले थांबा :
आम्ही थांबलो.

हिप्नॉटिस्ट म्हणाले सुरू करा :
आम्ही घोषणा सुरू केल्या.
आमचे कर्णे करून हिप्नॉटिस्ट
आमच्यातून न थांबता बोलले.

हिप्नॉटिस्टांनी हुकूम केला
एकसाथ द्वेष करा :
आम्ही करकरा चावले सामूहिक द्वेषाचे दात.
मग हिप्नॉटिस्टांनी आपल्या हातांतल्या पेट्यांत
आमच्या कागदचळ्या करून टाकल्या
मते टाकावीत तशा.
शाबास! शाबास!
आम्ही टाळ्यांचा पाऊस पाडला.

मग एका प्रचंड टोपलीत
हिप्नॉटिस्टांनी आमचे चेहरे गोळा केले :
आता आपले आपण असण्याची भीती गेली,
गळ्यात दाटून येणारा
काळोखाचा हुंदका गेला,
आता जगलो तरी कळणार नाही.
हिप्नॉटिस्टहो,
ही तुमची कृपा.
आम्ही सुखी आहोत.
आम्ही सुखी आहोत.

मुंबई
१८-१-७०

# प्रश्नोपनिषद्
(नाथ पै यांस)

या फूटपाथच्या पोरांचे राष्ट्र कुठले ?
यांच्यावर पाखर धरील असे निशाण कुठले ?
यांचे पुराण कुठले ? कुराण कुठले ? धम्मपद कुठले ?
यांच्यासाठी उषःकाल होईल असे क्षितिज कुठले ?

अर्वाच्य शिवी ओठांत दाटून यावी कचकचीत
तसे यांना गर्भांत घेऊन दारिद्य गरोदर राहिले :
कितीएक वाहून गेले गटारांशी इमान राखून,
कितीएक चिकटून राहिले आयुष्याला जिवटपणे.

कुणी हाक दिली आणि हे पेटून उठले,
कुणी घोषणा केल्या आणि हे लढत सुटले,
यांची बेवारशी प्रेते लागली काळोखाच्या काठाशी :
म्हणतात जे आले यांच्यासाठी ते स्वातंत्र्य कुठले ?

यांच्यासाठी पान्हा सोडतील असे स्तन कुठले ?
यांच्या जखमांनी शिवशिवतील अशी मनगटे कुठली ?
वासनेच्या कुबट गल्लीत झिंगलेले यांचे बाप कुठले ?
या कडू ओठांवर जहरलेले शाप कुठले ?

क्षयी फुफ्फुसांसारख्या झोपड्यांतून भरलेली दारूची कोठारे
अटळ भडकून उठतील तेव्हा जळतील ती घरे कुठली ?
रस्तोरस्ती मोजताही येणार नाहीत अशी प्रेते कुठली ?
या भयाण वणव्यात बेचिराख होईल ती संस्कृती कुठली ?

पुणे
१९-५-७०

# तुमच्यासाठी

(अजित, अजली, अभय यांस)

ही सारी फुले तुमची आहेत :
जे उमलतात
त्यांचाच हक्क असतो-फुलांवर.
यापुढचे सारे सूर्य
तुमच्यासाठी उगवतील
कारण तुमच्या कंठांत
नव्या प्रकाशाच्या ऋचा आहेत,
कुढणाऱ्या काळोखाची पूजा
तुमच्या हृदयांत नाही,
तुमच्या प्रत्येक पावलात
नव्या विकासाची दिशा आहे.

तुमच्या खांद्यांवर
आम्ही काळोखाचे ओझे ठेवले :
तुमच्या खांद्यांइतकेच
तेही तुमचेच आहे.
तुमच्यासाठी आम्ही वारसा ठेवला
पिचणाऱ्या माणसांचा,
झिजलेल्या आकांक्षांचा,
कुजणाऱ्या झोपडपट्ट्यांचा,
द्वेषाच्या वणव्यांचा,
सत्तेच्या हपापाचा,
विक्राळ भुकेचा.

हे ओझे नाकारू नका :
फुलांइतकेच, सूर्याइतकेच
हे ओझेही खरे आहे.
जो काळोखापासून पळतो
त्याच्यासाठी सूर्य नसतो.
जो मृत्यूला भितो
त्याच्यासाठी फुले उमलत नाहीत.
काळोखाचे थैमान घालीत हा वारसा येईल
तेव्हा सूर्य घेऊन त्याला सामोरे जा.

माणसामाणसांत आम्ही उभ्या केलेल्या भिंती
कोसळून टाकणाऱ्या पोलादी पहारी व्हा,
पण पहारींची माणसांवर
मात होऊ देऊ नका :
माणसाहून मोठे काहीच नाही
हे ज्यांना कळते
त्यांच्यासाठीच फुले उमलतात,
त्यांच्यासाठीच सूर्य उगवतो.

ही सारी फुले तुमची आहेत,
यापुढचे सारे सूर्य तुमचे आहेत.

मुंबई
२६-९-७०

# पॉलिटिक्स

ढोलनगारे वाजतील
मिरवणुका गाजतील
घोषणांची नखे साऱ्या भिंती ओरबाडतील

आव्हाने ठोकतील
शिव्याशाप ओकतील
जितेपणी बापाची प्रेतयात्रा काढतील

जिंकणारे मुजोर होतील
हरणारे शिरजोर होतील
रिकेटी पोरांची हाडे विझू लागतील

टरफले पेरणारे
विध्वंस हेरणारे
स्मशानाच्या शेतातून कोणते पीक काढतील ?

मुंबई
५-३-७१

# डमी

डांबरट रस्त्यावर लोखंडी धमक्या खणाणल्या,
पडेल खांद्यांच्या झाडांनी नेसणे सावरली,
फेकले गेले घोषणांचे पेटवले बोळे :
गवतभरली माणसे धगीनेच थरथरली.

आयमाय उद्धरीत सणाणला बसवर दगड :
भराभर बाहेर पडली इस्त्रीची झुरळे,
अचकट शिव्यांशी लाचार एकान्त करीत
सभ्य संस्कृतीची अवलाद रस्ताभर विखुरली.

अलीशान इमारतींच्या किलकिल्या खिडक्यांतून
बघू लागली माणसे बसचे धूड जळताना,
फोडून फाकवलेल्या कापड-दुकानातल्या
उंची साड्यांना केसाळ हावरे पाय फुटताना.

फुटल्या शोकेसमधली उंची साडीतली डमी
रस्त्यावर उताणी प्लास्टरच्या मांड्यांसकट...

मुंबई
१२-६-७१

## बांधिलकी

आतला माणूस पटण्यासाठी तो अटळ वेदना देतो
जेव्हा आपल्या मुखवट्यांना तुम्ही चेहरे समजत असता

वेडगाणे गात गात तो स्वप्ने घेऊन येतो
जेव्हा तुम्ही आयुष्याचा उभा बाजार मांडून बसता

चिखलाचे पाय घेऊन तोच फक्त आत घुसतो
जेव्हा तुम्ही संस्कृतीचे नटवे दिवाणखाने करता

आपला कठोर शोध घेत तो काट्यांची उशी घेतो
गर्दीचा नळ फुटून जेव्हा तुम्ही वहात असता

कानफाट्या बनून तो आपले हात पोळून घेतो
सत्तेपुढे जेव्हा तुम्ही औचित्याची कसरत करता

संस्कृतीला जाळणारे शब्द त्याचे चूड बनतात
देहविक्रय करणारी जेव्हा तुम्ही गाणी मागता

एकटे असण्यासाठी तो जखमांची किंमत देतो
फेसाळलेल्या जल्लोषात जेव्हा तुम्ही बुडत असता

पहाटेच्या परडीतून तो कोवळी गाणी आणतो
तेव्हा त्यांच्याच पाकळ्यांचा तुम्ही प्राणात प्रकाश बघता

मुंबई
२३-६-७१

## पुतळा

कलाबतूने चमचमणारे
गलेलठ्ठ हार घेऊन
हमरस्त्यावर माझ्या मागे
जेव्हा ते धावत आले :
जिवाच्या करारानें
मी धूम पळत सुटलो
फेंगाडे पाय उचलीत,
पँटीला पार्श्वभागी लावलेले
विशोभित ठिगळ दाखवीत.

मला पक्के ठाऊक होते :
ज्याच्या गळ्यात पडतील
त्यांचे उंची हार
त्याचा तिथेच रस्त्यावर
ठार दगडी पुतळा होतो
आणि त्या पुतळ्यावर
सुखवस्तू कावळे आणि कबुतरे
शिटून शिटून
सांस्कृतिक रांगोळीची
आरास मांडतात.

मुंबई
११-७-७१

# माझ्या मेंढरांनो

तुमचे भले असो माझ्या मेंढरांनो,
जीव सांभाळीत यथातथ्य चाला रस्त्याने,
अंगाशी अंग घाशीत ऊब घेत चाला
की तुमचा थरकाप तुम्हालाही कळू नये,
चालता चालता लेंड्यांनी कुंडल्या मांडा प्राक्तनाच्या,
मुतत मुतत नागमोडी रेघा ओढा काळावर,
तुम्ही कळप करून चाला,
सांघिक बेंऽ बेंऽ म्हणत चाला,
तुमच्यापैकी कोणी केला असेल काल शरीरसंबंध
किंवा कोणी एकमेकांशी क्रुद्ध लढाया,
सुखी मेंढरांनो, बागडत बागडत चाला,
तुमच्या डोक्यावर, पाठीवर खुणेसाठी लावलेले रंग
ज्यांनी ओळखता येतात
तुमचे वेगळे कळप, वेगळी मालकी,
मेंढरांनो, तुम्ही भांडवल आहात,
मेंढरांनो, तुम्ही नफा आहात
कारण माझ्या मेंढरांनो, तुम्ही मेंढरे आहात,
मेंढरांनो, खाटीकखाना जवळ आला माझ्या मेंढरांनो,
देव तुमचे भले करो माझ्या मेंढरांनो,
सांघिक बेंऽ बेंऽ करण्याची हीच वेळ माझ्या मेंढरांनो,
सर्वांची काळजी करणारा तो
तुमची वाट बघतोय माझ्या मेंढरांनो.

मुंबई
२०-१२-७१

# मी अर्थ शोधतो

मथळ्यांची जंगले तुडवीत मी अर्थ शोधतो
माणसाच्या डोळे विझलेल्या अंधारमय वेदनेचा,
ठार करून फेकलेल्या माणसांची चेहरे ओरबाडलेली भाषा
करू पहाते अटळ इतिहासाची नव्याने रचना,
मी बोलत बसतो माझ्याच मनाशी भीत भीत
टरकलेल्या करुणेचे हताश उद्गार,
खुनी काळोख दबा धरून करतो पाठलाग,
माझ्या पायांतले बळच निघून जाते
सामर्थ्याच्या वेशीवर निर्दयपणे टांगलेली
माणसांची असहाय्य लक्तरे पाहून,
बदमाषाच्या बोटात चमकावी हिऱ्याची आंगठी
तशी चमकताना बघतो दगाबाज ओठांत उंची तत्त्वज्ञाने
आणि एका न दिसणाऱ्या सुऱ्याचा अपरिहार्य धाक,
सापांशी संगनमत करणारे धूर्त गरूड
मी बघतो चिमण्यांचे चवीने बळी घेताना...

मेलेल्या मुंग्यांसारखी गोळा करतो मी अक्षरे
माझ्या निचेष्ट डोळ्यांना श्रद्धांजली वहाण्यासाठी.

मुंबई
२२-१२-७१

## म्हातारी

आपण जर विचारू लागलो अर्थ
तर आपले डोके फिरेल
—अर्थात आधी फिरलेले नसले तरच.
आपण थोडेच असतो राजपुत्र सिद्धार्थ ?
असतो तर मिळती चक्क सुट्टी
आपल्या जयंतीला सगळ्या कचेऱ्यांतून
—ती तर आपल्या
मयंतीलाही नाही मिळायची
आपण दांडी मारल्याशिवाय :
जी अटळ आपल्यापुरती.

एक म्हातारी होती,
म्हणजे जिवंत असताना
कशीबशी होती,
म्हणजे मेलेली नव्हती
म्हणून जिवंत होती
इस्पितळाबाहेरच्या रस्त्यावर,
हगणेमुतणेखोकणेनिजणे तिथेच
मरणाच्या फूटपाथवर.

मी ओरडून विचारले म्हातारीला :
म्हातारे, तुझ्या जगण्याचा अर्थ काय ?
तू माझी कोण ?
किंवा तू आमची कोण ?
या इमारती,
या मोटारी,
ती राष्ट्रीयीकरण झालेली बँक,
हे इस्पितळ,
ते पलीकडचे देऊळ,
समोरून जाणारा मोर्चा...
यांचा तुझा संबंध काय ?
म्हातारे, युद्ध म्हणजे काय ?
म्हातारे, विजय म्हणजे काय ?

म्हातारे, साम्राज्यवादी म्हणजे काय?
म्हातारे, क्रांती म्हणजे काय?
प्रतिक्रांतिकारकांच्या कत्तली,
अतिक्रांतिकारकांच्या कत्तली,
मग कत्तली,
पुन्हा कत्तली,
आणखी कत्तली
म्हणजे काय?
म्हातारे—

मरणाच्या फूटपाथवर
म्हातारीपाशी
फक्त असह्य दुर्गंध.

मुंबई
९-१-७२

# शुभ्र कबूतर

उद्ध्वस्त घराच्या ढिगाऱ्यावर
फिरते लंगडत पांढरे शुभ्र कबूतर,
निखळून लोंबणाऱ्या हातासारखी तुळई,
गुदमरल्या किंकाळ्या जपणारे
जळक्या भिंतींचे सांगाडे,
दुभंगून गेल्या चुलीशेजारी
उपाशी घोटाळणारे कुत्रे,
आता एकही गिधाड थांबलेले नाही
शिल्लक नसलेल्या लचक्यासाठी,
झाडांवर काही रिकामे कावळे,
ओसाड शांततेला कोड फुटावे तसे ऊन

आणि उद्ध्वस्त घराच्या ढिगाऱ्यावर
लंगडत फिरणारे पांढरे शुभ्र कबूतर...

मुंबई
१६-१-७२

# पूल

पानांतून वाऱ्याचा
मऊ झुळझुळ आवाज

विखुरलेल्या खेळण्यांसारख्या
बळींच्या कवट्या आणि हाडे

यांतले काय खरे ?
यांतले काय खोटे ?

की एक खरे
आणि दुसरे खरे
यांत असतो
अर्थशून्यतेचा पूल
मरणाच्या नदीवर बांधलेला ?

मुंबई
२२-१-७२

## वर्षं संपले

वर्षं संपले.
काही मेले.
काही जन्मले.
काही जुन्याच पोकळीत
नवा गहिवर काढीत
जगत राहिले.
आम्ही नव्या कॅलेंडरांसाठी
गर्दी केली :
कॅलेंडरे देवादिकांची,
कॅलेंडरे थानदार नट्यांची.

वर्षं संपले.
जुन्याच घोषणा
चिंच लावून घासल्या,
लखलखीत केल्या.

वर्षं संपले.
यूरोपची हॉलिडे दूर करून
मिस मोनिका परत आली :
नव्या स्टाइलने
कुल्ले हलवीत
चालू लागली
नव्या वर्षाबरोबर.

वर्षं संपले.
म्हातारे जोशीबुवा
झाले अधिकच भ्रमिष्ट :
जोशीणबाई करवादू लागल्या
जिवाच्या आकांताने :
पन्नास वर्षांच्या निष्ठेवर
कपाळ आपटीत
वर्षं संपले.

वर्ष संपले.
त्याने खूप प्रयत्न केला
हिलेरिअस होण्याचा :
भर पार्टीतही व्हिस्की चढेना.
त्याने पिता पिता
मिसेस प्रियाळच्या कुल्ल्यावर
हलकेच चापट मारली.
तिचा नवराय् मोठ्याने हसला
एंजॉय करीत बॉसचा ह्यूमर,
ऑल इन अ जोक, ऑफ कोर्स,
तरीही त्याला व्हिस्की चढेना.

वर्ष संपले.
तो घरी आला काळोखात.
संपलेल्या वर्षाच्या कॅलेंडरची
सुरळी करून त्याने सारली
—वेस्टपेपर बास्केटमधे,
नवे कॅलेंडर उघडल्यासारखा
तो पसरला कॉटवर
आणि जुन्या वर्षाच्या
काळोखात
वर्ष संपले.

मुंबई
२२-१-७२

## कोंबड्या

कितीएक परमेश्वरांचे
अंत पाहिले :
पाहिले त्यांना
घोषणांच्या तिरड्यांवरून
उचलून नेताना.

शोषलेले रक्त नासून
काळ्या बनलेल्या पैशातून
पाहिली उभी रहाताना
पांढरीशुभ्र
संगमर्मरी मंदिरे.

पाहिले दगड
भयाचे भडक शेंदूर थापलेले :
मेलेल्या मनांवर
अबाधित राज्य करताना.

संघटित सत्ताबाजांनी
धर्मांच्या खुराड्यात
पाळलेल्या कोंबड्या
भक्तिभावनेने प्रार्थनेचा
कलकलाट करताना
मला ऐकू आल्या
आणि जाणवला त्यांच्या
भविष्यकालीन सागोतीचा
खमंग वास.

मुंबई
७-५-७२

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
क्र. 22286
काव्य 234
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## जमाखर्च स्वातंत्र्याचा

जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा ?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा ?

धूर्त शोषकांच्या ओठीं घोष संस्कृतीचा :
चूड इथे या ढोंगाला लागणार केव्हा ?

जाहिरात आई ज्यांची, जाहिरात बाप :
आत्मविक्रयाचे झेंडे फाडणार केव्हा ?

विलायती वेषांमधली भुंकतात कुत्री :
माणसास माणुस येथे मानणार केव्हा ?

घाम ओतुनी जो पिकवी मळे अमृताचे
दिवा झोपडीतुन त्याच्या लागणार केव्हा ?

प्राक्तनात अस्पृश्याच्या छळाचीच गाथा :
आग आंधळ्या धर्माला लावणार केव्हा ?

इथे पडे सत्तेभवती कडे भ्रष्टतेचे :
काजळी दिव्याभवतीची झाडणार केव्हा ?

किती काळ बघत बसावे फुगे घोषणांचे ?
भास हे भ्रमाचे सारे फोडणार केव्हा ?

मुंबई
१५-८-७२

## श्वापद

गुहेतून हजारो वर्षांच्या बाहेर पडलेले श्वापद
मागे उभे असते अनाकलनीय दबा धरून,
घालते झडप अचानक विमानातून फेकलेल्या बॉंबसारखी,
हिंस्र बलात्कारासारखी, कोथळ्यात घुसणाऱ्या सुऱ्यासारखी.

गुहा हजारो वर्षांची असते अंधारामागच्या खोल अंधारात
जिथवर पोचत नाहीत दिवसाचेही लखलखीत हात,
रानटी झुडपांच्या काट्यांवर अडकून फाटतात जेव्हा
किंकाळ्यांचे पतंग : श्वापद सुखावते स्वतःवरच खूष होऊन.

श्वापद बसते मानगुटीवर लहानमोठ्या राष्ट्रांच्या
आणि फुले लावणाऱ्या हातांच्याही बंदुका होतात,
कोसळतात धर्मग्रंथांवर करपलेल्या भिंती,
देवळांवर बसलेली गिधाडे दुवा देतात ईश्वराला.

श्वापद फुंकर घालते आपल्या गरम पिपासू श्वासांनी
तेव्हा रस्त्यारस्त्यात दहशतीचे बूट करकर वाजू लागतात,
माणसे नाहीशी होतात पण त्यांची प्रेतेही दिसत नाहीत,
छळछावण्यांतले सांगाडे लोंबकळत रहातात आपलीच कातडी धरून.

श्वापद हसू लागते आणि विहिरी प्रेतांनी भरून जातात,
विषवायूघरात अर्भकांच्या राशी पडतात कचऱ्यासारख्या,
राष्ट्रभक्तीच्या प्रचंड कर्ण्यातून श्वापद करू लागते घोषणा
तेव्हा जन्माला येते अत्याचारांचे एक नवे विज्ञान.

कधी श्वापद कंटाळते आणि गुपचूप जाऊन झोपते
अंधारामागच्या अंधारातल्या हजारो वर्षांच्या खोल गुहेत :
मग संस्कृतीचे उत्सव सजतात, रसीले सूर बरसतात,
माणसे मिठ्या मारतात एकमेकांना, नाचूबागडू लागतात,

चर्चा करतात कवितांतल्या प्रतिमांवर, लाड करू लागतात
पिंजऱ्यात पाळलेल्या पाखरांचे, दिसू लागतात माणसांचे चेहरे

आंतरराष्ट्रीय करारांसारखे विश्वासू, संस्कृतीच्या जयघोषात
कुणालाही ऐकू येत नाहीत कंटाळून झोपलेल्या श्वापदांचे सुस्त श्वास.

मुंबई
२३-९-७२

# साक्षी

कोण मी यांचा अखेरी आणि माझे काय नाते ?
मी कशाचा येथ साक्षी ? मी म्हणू माझा कुणाते ?

जात अन् उपजात यांची, धर्म यांचे, द्वेष यांचे,
घोषणा घोषीत उंची लांडग्यांची फौज जाते.

यावयाला झिंग यांना लागते अध्यात्मगोळी :
माजले स्वामी, बुवा, आचार्य यांचे मोक्षदाते.

सोसवेना एकही यांना विरोधी शब्द साधा :
आतुनी मारेकरी हे संस्कृतीचे थोर त्राते.

झेलिती थुंकी खळांची, लाथ यांची सज्जनांना,
भ्रष्टतेचे अश्व यांच्या ओढिती सत्तारथाते.

झुंडशाहीच्या नखांची दाविती सत्यास भीती,
शापिती हे आरशांना पाहुनी अपुल्या मुखाते.

मेंढरांचे काळ हे, सेनापती हे भेकडांचे,
सोसताना सत्य यांच्या मनगटांचे शेण होते.

दहशतीचे बूट जेव्हा वाजती रस्त्यातुनी या :
थंढ या साऱ्या घरांच्या धाप लागे काळजाते.

मुंबई
२५-३-७३

## हात उगवतील

हात उगवतील,
कसे कळत नाही
पण उगवतील :
पिचलेल्या माणसांच्या
विटलेल्या रांगांतून,
उपाशी पोरे घेऊन
उपाशी आईने जीव दिला
त्या विहिरीतून,
कचऱ्याच्या पेटीतले
सडलेले अन्न चिवडणाऱ्या
रिकेटी पोरांतून,
दुष्काळात लुटल्या गेलेल्या
हताश अब्रूतून,
हात उगवतील :
कसे कळत नाही
पण उगवतील.

हात उगवतील
निष्पापांच्या यातनांतून,
हात उगवतील
डाकबंगल्यांवरच्या बलात्कारांतून,
हात उगवतील
शेण झालेल्या बुद्धिमान कण्यांतून,
हात उगवतील
ओठांतच चिणलेल्या शापांतून,
हात उगवतील
भवितव्य नसलेल्या पिढीतून,
हात उगवतील
दलित झोपड्यांतून,
हात उगवतील
रडून सुजलेल्या डोळ्यांतून,
हात उगवतील
काळ्या बाजारात विकलेल्या धान्यातून,

हात उगवतील
थंडीत मरून पडलेल्या भिकाऱ्यांतून,
हात उगवतील
लाठीमारात फुटलेल्या कवट्यांतून,
हात उगवतील :
मोजताही येणार नाहीत
इतके उगवतील.

हात उगवतील
तेव्हा काळाकुट्ट अंधार असेल,
उन्मत्त राजरस्ते
असतील झोपलेले
बेडूक गिळून सुस्त झोपल्या सापासारखे,
घरे असतील
गब्रू पोटांसारखी तुडुंब :
सत्तेच्या पाचकात पचवीत
गिळलेली लूट,
शास्त्यांच्या हातांतल्या वेसणी
असतील पेंगत गरम गुर्मीत,
पहाऱ्यांच्या संगिनी
राखण करीत असतील
अंधाराची,
दडवलेल्या तिजोऱ्यांतून
असेल निर्धास्त
अपार संपत्ती
सडवून माणूसकी जमवलेली.

आणि अचानक
हात उगवतील,
हात उगवतील
अगणित मशाली होऊन,
मशाली हातांच्या
अनावर
ळळलळू लागतील
महाकालीच्या जिभेसारख्या,
गिळू लागतील आभाळ,

माजलेली घरे जळताना
आपल्याच धुराने गुदमरतील.

हात उगवतील :
मोजताही येणार नाहीत
इतके उगवतील.

मुंबई
२७-१०-७४

# भिंत

भिंत माझ्याभोवती,
भिंत तुझ्याभोवती,
भिंतामि भिंतावः भिंतामः,
भिंती भिंती सर्व गडे
इकडे तिकडे चोहिकडे,
भिंत भीतीची,
भीती भिंतीची,
भिंतीला कान असतात
म्हणून प्रत्येक भिंतीला
भीती प्रत्येक भिंतीची,
लहान लहान भिंतींची
एक प्रचंड भिंत
अदृश्य कोंडणारी.

भिंतीसमोर उभे रहा
जीभ कापून उभे रहा
कानांत बोळे उभे रहा
डोळे बंद उभे रहा
खाली बसा, उभे रहा
कान धरा, उभे रहा...

कोणीतरी हरवला :
कोण बरे? कळलेच नाही!
चौघांची वाचा गेली :
कोणाची? कळलेच नाही!
तिघांचे डोळे गेले :
कोणाचे? कळलेच नाही!
एकसाथ आवाज द्या :
"सर्व भिंती सर्वांच्या सर्वकल्याणासाठी."
एकाने आवाज दिला नाही :
तो दिसेनासा झाला :
कोण बरे? कळलेच नाही!

भिंतींची सवय होईल,
सवयीची भिंत होईल,
भिंतीला शिस्त हवी,
शिस्तीला भिंत हवी.

एऽक दोऽन तीऽन चाऽर
भिंतवाल्यांची डोकी हुषार,
जय बोला हो जय बोला
या भिंतीचा जय बोला...

मुंबई
३१-७-७५

## साधी, सोपी कविता

अगदी आपली साधी, सोपी कविता :
बाळबोध घराण्यातल्या वळणासारखी सरळ,
कुणाच्या अध्यात नाही,
कुणाच्या मध्यात नाही,
नाकासमोर वास न घेता चालणारी,
डोकीवर पदर घेऊन बोलणारी,
डोके असले पाहिजे
पदर घेण्यासाठी,
पदर घेतला पाहिजे
डोके आहे म्हणून,
अशी ही घराणेदार, नम्र,
साधी, सोपी कविता.

अशी माझी साधी, सोपी, सरळ कविता
तोंड बांधलेत तरी स्वस्थ आहे
कारण तुम्हाला हवी तीच तिला शिस्त आहे,
पण तुम्ही म्हणाल तर
तोंड खोलते बरे,
तुम्हाला हवे तेच
ती बोलते बरे,
अशी बोलते छान
की पोपटाने घालावी खाली मान.
तुम्ही म्हणा आगेकूच :
ही म्हणते आगेकूच,
तुम्ही म्हणा आबादीआबाद :
ही म्हणते आबादीआबाद,
तुमच्या इषाऱ्यावरच तिची भिस्त आहे
कारण मुख्य म्हणजे तिला शिस्त आहे.

माझी साधी, सोपी, सरळ कविता
कुणाविषयीच रागाने तिरके बोलत नाही,
सर्वांची सोय पहाते,
कुणीही वाचावी,

कुणीही छापावी,
कुणीही तपासावी,
कुठेही कापावी,
कापली तरी हूं नाही,
छाटली तरी चूं नाही,
कारण ती आहे
साधी, सोपी, सरळ कविता
जिला काही घडवायचे नाही,
जिला काही दडवायचे नाही.

साध्या, सोप्या कवितेत या
साधी, सोपी गोष्ट आहे :
एक होता ससा
ढगासारखा शुभ्र,
कापसासारखा मऊ,
त्याला खूप आवडायचा
कोवळ्या गवताचा हिरवा खाऊ,
खाऊसुद्धा थोडाच खाई,
सुखाने झोपी जाई...
साध्या, सोप्या कवितेतली
गोष्ट साधी, सोपी
जिच्यात ससा गेला झोपी,
ससा किती शहाणा :
जागेपणाचा करीत नव्हता बहाणा.

गोष्टीत प्रतीक नाही,
गोष्ट तिरकी नाही,
कुणाचीच फिरकी नाही,
प्रतीक म्हणजे डोक्याला त्रास,
फिरकी म्हणजे फुकटचा फास :
लिहिणाऱ्याला फास,
छापणाऱ्याला फास.

साध्या, सोप्या कवितेत या
पण तसे काहीच नाही,
कोणालाच त्रास नाही,

कोणालाच फास नाही,
खालून वाचा,
वरून वाचा,
उजवीकडून वाचा,
डावीकडून वाचा,
कुठूनही वाचली तरी एकच,
कापणार तर कापा,
खालून, वरून, मधून कापा :
जेवढी उरेल तेवढी छापा,
जो कापील त्याचे भले,
जो छापील त्याचे भले,
जो न छापील त्याचे भले,
जो वाचील त्याचे भले,
जो न वाचील त्याचे भले...

अशी माझी कविता साधेपणा जपते
आणि वाचूनही किती लवकर संपते.

मुंबई
१-८-७५

दा. क्र. २२२८७
काव्य
२३४२
REFBK-0022287
REFBK-0022287